



# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४७५ सोमवार दि २८ सप्टेंबर २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# एमपी.एस.सी. पेपरफुटीचा बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील शेलू गावचा कनेक्शन!

## शेलू गावचा विजय किंगर गजाआड; बुलढाण्यापर्यंत पोहोचले पेपरफुटीच्या रॅकेटचे धागेदोरे!

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाने आता अक्षरशः मोठा भूकंप घडवला आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या तपासात या प्रकरणाचे धागेदोरे सांगली, बुलढाणा आणि नवी मुंबईपर्यंत पोहोचले असून आणखी दोन उमेदवार आणि दोनमध्यस्थांना अटक करण्यात आली आहे. यामुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या थेट ११ वर पोहोचली आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे अटक झालेल्या उमेदवारांमध्ये विजयकिंगर याचा समावेश असून तो बुलढाणा जिल्ह्यातील शेलू, ता. सिंदखेडराजा येथील असल्याची स्थानिक माहिती समोर आली आहे .आणि त्याला तेथून अटकही करण्यात आली आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या माहितीनुसार विजय किंगर हा बुलढाणा जिल्ह्यातील उमेदवार असून दुसरा उमेदवार साजिद संदे हा सांगली येथील आहे. या दोघांनी प्रश्नसंच बेकायदेशीरपणे मिळवल्याचा पोलिसांचा आरोप आहे या दोघांना प्रश्नसंच मिळवून देण्यात कथित भूमिका असलेल्या संदीप खलाटे आणि भैरवनाथ कदम या दोन मध्यस्थांना नवी मुंबईतून पकडण्यात आले. गुन्हे शाखेच्या तपासानुसार, एमपीएससीच्या गोपनीय कक्षातून तज्ज्ञांनी निवडलेल्या प्रश्नसंचाच्या प्रती तयार करून त्या आर्थिक फायद्यासाठी बाहेर काढण्यात आल्याचा संशय आहे. या प्रकरणात यापूर्वी एमपीएससीचे अवर सचिव अभिजीत लेंडवे, सहाय्यक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते, गोपाळ मराठे यांच्यासह इतर आरोपींनाही अटक करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे विजय किंगरचे नाव औषध निरीक्षक पदासाठी प्रसिद्ध झालेल्या पात्र उमेदवारांच्या यादीतही आहे. या प्रकरणाचा मुद्दा सुरुवातीपासून लावून धरणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवारयांनी एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी यापूर्वी प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच काही उमेदवारांपर्यंत पोहोचल्याचा दावा केला होता आणि चौकशीची मागणी केली होती. मात्र हे राजकीय आरोप असून त्यांची अंतिम सत्यता तपास व न्यायालयीन प्रक्रियेतूनच निश्चित होणार आहे.




दरम्यान, प्रारंभी एका उमेदवारापुरते प्रकरण मर्यादित असल्याचे चित्र होते; मात्र त्यानंतर झालेल्या अटकसत्रामुळे तपासाची व्याप्ती मोठी असल्याचे स्पष्ट होत आहे. ऋतुजा पाटीलसह अन्य उमेदवारांपर्यंतही प्रश्नसंच पोहोचल्याचा पोलिसांचा दावा आहे. किती उमेदवारांपर्यंत पोहोचला? त्यासाठी किती पैशांची देवाणघेवाण झाली? आणि या साखळीच्या मुळाशी आणखी कोण कोण आहे?मुंबई गुन्हे शाखेचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे पेपरफुटीचे नवे थर उलगडत आहेत. आता बुलढाण्यातील शेलू गावापर्यंत या प्रकरणाचा धागा पोहोचल्याने जिल्ह्यातही मोठी खळबळ उडाली आहे! मुंबई आणि मुंबई क्राईम ब्रँचचे अधिकारी सिंदखेडराजात दाखल झाल्यानंतर, बुलढाणा जिल्ह्याचे एस.पी. निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार आशिष इंगळे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने तपास पथकाला आवश्यक ते सहकार्य व मदत केली.

---

# दुष्काळात बळीराजा हवालदिल अन् पुन्हा धावून आला शेगावीचा राणा!...

## श्री गजानन महाराज संस्थानकडून १ कोटी ११ लाखांची मदत!

**जनसंचलन/शेगाव**

राज्यात दुष्काळाच्या झळांनी शेतकरी होरपळत असताना शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीचा मोठा आदर्श उभा केला आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाच्या मदतीसाठी संस्थानने थेट १ कोटी ११ लाख रुपयांचा सहयोग निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिला आहे. श्री गजानन महाराज संस्थानच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाने मोठी ओढ दिल्याने राज्यातील अनेक भागांत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळामुळे बाधित शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी संस्थानच्या वतीने हा मोठा निर्णय घेण्यात आला. २७ सप्टेंबर २०२६ रोजी १ कोटी ११ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला, अशी माहिती संस्थानने दिली आहे. सेवा, त्याग आणि मानवतेचा वारसा जपणाऱ्या श्री गजानन महाराज संस्थानने संकटाच्या काळात शेतकऱ्यांसाठी उचललेले हे पाऊल सध्या सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे





# पाऊस कधीचा छळतो...



महाराष्ट्रात सध्या वेगवेगळे आवाज खूप मोठ्याने ऐकू येत आहेत. कुठे डीजेच्या समर्थनाचा, तर कुठे विरोधाचा. कुठे जरांगेंच्या पाठीराख्यांच्या घोषणा आहेत, तर कुठे धनगर आरक्षणाचे नारे ऐकू येत आहेत. कुठे विद्यानंद बापटांची मराठी, तर कुठे दीपकेंचे जेन-झींचे प्रश्न गुंजत आहेत. या सगळ्या आवाजात एका मोठ्या प्रश्नाचा आवाज क्षीण आहे. हा आवाज काही दिवसांत आक्रोशात बदलण्याची दाट शक्यता आहे. हा आवाज आहे, पावसाच्या तुटीचा आणि दुष्काळाच्या संकेताचा. पावसाळ्यात दमदार कोसळणाऱ्या पावसाने या वेळी चांगलेच छळले. ङ्गपोळा आणि पाऊस गोळाफ म्हणतात. या वेळी गणेशविसर्जनाची वेळ आली तरी अनेक ठिकाणी पावसाची प्रतीक्षा सुरूच आहे. तो जेवढा हवा तेवढा पडलेलाच नाही. गेल्या वर्षी सप्टेंबरच्या मध्यंतरात जेवढा पाऊस झाला होता, या वेळी त्याच्यापेक्षा २५ टक्के पाऊस कमी झाला आहे. सरकारच्या ङ्गमहारेनफ्वर झळकणारी पाऊसतुटीची आकडेवारी पोटात गोळा आणणारी आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी १९ जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट ही २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. दुष्काळाचे सावट दर्शविणारी आहे. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी सहा जिल्हे, विदर्भातील अकरापैकी आठ जिल्हे पावसासाठी आसुसलेले आहेत. सर्वाधिक पाऊसतूट ही सोलापुरात आहे. तिथे निम्माच पाऊस पडला आहे. दर वर्षी भरभरून कोसळणाऱ्या कोकणातही या वेळी पाऊस हातचे राखून कोसळला आहे. ८३ तालुक्यांत तर तो गेल्या २० दिवसांपासून दडी मारून बसला आहे. कुठे कुठे ३० दिवस झालेत; शेतकऱ्यांनी पावसाचे थेंब बघितलेले नाहीत. त्यामुळे कापूस, ज्वारी, सोयाबीन, उडीद, मूग यांसारखी खरीप पिके करपून गेली आहेत. कुठे ती मान टाकण्याच्या स्थितीत आहेत. त्याचा फटका शेतकऱ्यांच्या उत्पादनास बसेल. न पेरताच भराभर वाढलेले महागाईचे पीक, करपत चाललेल्या पिकांची सद्यस्थिती, अन्नधान्याच्या टंचाईला, महागाईवाढीला खतपाणी घालू शकते. त्याच्या झळा शेतकऱ्यांना बसतील. ग्राहकांनाही बसतील. पुढे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होईल. पाऊसच झाला नाही तर भूजल पातळीचा, पाण्याच्या साठवणीचा आणि पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या वर्षी पाऊस दगा देणार हे संकेत मिळत होते. ङ्गएल निनोफ्चे अभ्यासक तसे सांगत होते. ङ्गचांगला पाऊस पडेपर्यंत पेरणी करू नका,फ असे मुख्यमंत्री उन्हाळ्यापासूनच सांगत होते. मध्यंतरी तो थोडा बरसला. पेरण्या आटोपल्या. पिके वाढू लागली आणि पाऊस थांबला. तो आता येईल, मग येईल म्हणत शेतकरी डोळ्यांत प्राण आणून त्याची वाट बघत होता. आता तो उघड्या डोळ्यांनी पिकांचे मरण बघतो आहे. निसर्गाचे असे अनैसर्गिक वागणे आणि हंगामाची अनिश्चितता हे शेतकऱ्यांचे खरे दु:ख आहे. पूर्वी हंगामाबाबत असे म्हणायचे की, तो एक वर्ष खूप जोरदार होतो, एक वर्ष चांगला होतो आणि तीन वर्षे कष्टकारी असतो. हल्ली पावसाने सगळी गणिते बदलली आहेत. तो उशिरा येतो. लवकर जातो. त्याच्या बरसण्याच्या दिवसांतही घट झाली आहे. पावसाचे येणे-जाणे आपल्या हाती नसले तरी, त्याचे जेवढे म्हणून थेंब जमिनीवर पडतात, त्यातील एकेका थेंबाचा वापर होणे गरजेचे आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेने विषयाचे गांभीर्य सगळ्यांनाच कळले असेल. त्यातून त्यांनी कुणालाही वाऱ्यावर न सोडण्याची आणि तातडीने सर्वेक्षणाची भूमिका घेतली. कर्नाटक सरकारने आपल्या फार पूर्वी म्हणजे गेल्या महिन्यातच शेतीची स्थिती बघून १०१ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याचे धोरण स्वीकारले. महाराष्ट्रानेही राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या खाचखळग्यात न अडकता तातडीने भूमिका घेणे अपेक्षित आहे. दुष्काळ जाहीर करण्यावरून वादळ उठेल. आरडाओरड, आरोप-प्रत्यारोप होतील. ही वेळ शेतकऱ्यांना आधार देण्याची आहे. नियम-अटींना थोडा मोडता घालून, जिथे जिथे शक्य तिथे अधिकाधिक मदत करण्याची आहे. १९७२चा असो की २०१३चा दुष्काळ असो; त्या वेळी ज्या ज्या म्हणून चांगल्या गोष्टी केल्या, त्याची पुनरावृत्ती व्हावी. सरकारने आणि शेतकऱ्यांनी हवामान बदलाकडे अपवाद म्हणून न बघता त्याचा पॅटर्न समजून घ्यायला हवा. डॉपलर रडारसारख्या यंत्रणा पावसाचा अचूक अंदाज देतील. त्या पाऊस पाडणार नाहीत. निसर्गचक्र विस्कळित होऊ नये म्हणून निसर्गबाधक कृती थांबविणे, पावसाच्या पाण्याचे नियोजन करणे हा बोध घेण्याची गरज आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# चर्चा करून घेतली होती टी-20मधून निवृत्ती, हिटमॅनने केला खुलासा; म्हणाला, "माझं-विराटचं बोलणं झालं होतं की.."

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय संघाने १७ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील २०२४ मध्ये बार्बाडोसच्या मैदानावर टी-२० विश्वचषकाचं जेतेपद पटकावलं. अगदी अटीतटीच्या सामन्यात भारताने अखेरच्या षटकात रोमांचक विजय मिळवला होता. भारताने जेतेपद पटकावल्यानंतर भारतीय संघातील प्रत्येक खेळाडूला अश्रू अनावर झाले होते.

सर्वांच्या डोळ्यात मैदानावर आनंदाचे अश्रू होते. या जेतेपदानंतर मैदानावरील अनेक क्षण सर्वांच्या मनात घर करून बसले. पण रोहित शर्मा व विराट कोहलीचा ड्रेसिंग रूमच्या पायऱ्यांवरील डोळ्यात अश्रू असताना एकमेकांना मिठी मारल्याचा





व्हिडिओ मात्र सगळ्यांचा आवडता व्हिडिओ आहे. या व्हिडिओबाबत रोहित शर्माने त्याच्या फुल हाऊस विथ रोहित शर्मा या कार्यक्रमात वक्तव्य केलं आहे.

रोहित शर्माच्या फुल हाऊस विथ रोहित शर्मा या कार्यक्रमात अभिनेता अंगद बेदी पुढील भागात आपल्याला दिसणार आहे. यादरम्यान अंगद बेदीने रोहित शर्माला प्रश्न विचारला की, "तुझा आणि विराट कोहलीचा एक आयकॉनिक क्षण आहे. जेव्हा तो पायऱ्यांवर चढतोय आणि तू दोन पावलं मागे येतो... तेव्हा विराट त्याचे अश्रू सावरत असतो आणि तुम्ही दोघं एकमेकांना मिठी मारता... तो जो क्षण होता, त्यादरम्यान नेमक्या भावना काय होत्या... सांगशील का..."

यावर रोहित शर्मा म्हणाला, "२०१५ पासून २०२४ पर्यंत आम्ही त्या वर्ल्डकपच्या मागे धावत होतो. बरेचदा विश्वचषक जिंकण्याच्या जवळ आलो, पण जिंकण्यात अपयशी ठरलो. २०१५, २०१९ मध्ये विजयाच्या जवळ होतो, मग २०२३ ची तर मला आठवणच नकोय. १९ नोव्हेंबर दिवस मला विसरायचाय. पण त्यानंतर जे सहा महिने होते, मला कुठेतरी माहीत होतं की, २०२४ चा टी-२० विश्वचषक माझा अखेरचा वर्ल्डकप असणार आहे आणि माझं-विराट कोहलीचं यासंबंधित बोलणं झालं होतं, की यानंतर आम्ही दोघं टी-२० खेळणार नाही. त्यामुळे त्या वेळेला भावना इतक्या तीव्र होत्या की आम्ही त्या वर्ल्डकपसाठी एवढे झगडलो आहोत आणि जेव्हा फायनली विश्वचषक जिंकला, तेव्हा काही कळत नव्हतं काय करायचं. समोर बरंच काही घडत होतं आणि त्यावर प्रतिक्रिया देत होतो."

भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताचे दोन दिग्गज खेळाडू म्हणजेच रोहित शर्मा व विराट कोहली यांनी टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती. विराट कोहलीने या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात महत्त्वपूर्ण अशा७६ धावा केल्या होत्या. यामुळेच भारतीय संघ १७६ धावसंख्या

## इराणला नमवत भारताच्या लेकींची कमाल ; कबड्डीत गोल्ड मेडल

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

आशियाई क्रीडा २०२६ स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वीच भारतीय कबड्डी संघाला गोल्ड मेडलसाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. भारतीय महिला कबड्डी संघाने दाखवून दिलं की, या संघाला जगातील सर्वोत्तम कबड्डी संघ का म्हणतात. गोल्ड मेडलसाठी झालेल्या सामन्यात भारत आणि इराण हे दोन्ही बलाढ्य संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने ३७-३४ च्या फरकाने सामना जिंकून गोल्ड मेडलवर नाव कोरलं. हास इतिहासाला गवसणी घातली आहे.

भारतीय कबड्डी संघ आपल्या आक्रमक खेळासाठी ओळखला जातो. या सामन्यातही असंच काहीसं चित्र पाहायला मिळालं. पहिल्या हाफमध्ये भारतीय संघाने आक्रमक खेळ केला आणि इराणला बॅकफुटवर ठेवत आघाडी घेतली. पहिल्या हाफच्या समाप्तीनंतर भारतीय संघ २२ -१६ ने आघाडीवर होता. त्यानंतर इराणने देखील पुनरागमन केलं. त्यावेळी भारतीय संघाच्या हातून गोल्ड मेडल जाणार की काय? असं वाटू लागलं होतं. पण शेवटी भारतीय संघाने ३७-३४ च्या फरकाने सामना जिंकून गोल्ड मेडल पक्कं केलं. हे आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील भारतीय महिला कबड्डी संघाने पटकावलेलं हे चौथे गोल्ड मेडल आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला संघाने २०१० पासून सुरुवात केली. त्यानंतर भारतीय संघाने मागे वळून पाहिलं नाही.भारतीय महिला कबड्डी संघाने २०१० आणि २०१४ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये गोल्ड मेडलवर कब्जा केला होता. त्यानंतर २०२२ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारतीय संघाने गोल्ड मेडल जिंकलं होतं. त्यानंतर आता २०२६ मध्ये पुन्हा एकदा भारतीय संघाने गोल्ड मेडलवर नाव कोरलं आहे. याआधी २०१८ मध्ये झालेल्या भारतीय संघाला अंतिम सामन्यात इराणकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे भारतीय संघाचं गोल्ड मेडल थोडक्यात हुकलं होतं. भारताला इराणकडून पराभवाचा सामना करावा लागला होता.

## तजिंदरपाल सिंग तूरची गोल्ड हॅट्रिक थोडक्यात हुकली अन् २०१८ चा विक्रमही गेला ! सिल्व्हर मेडलवर कोरलं नाव

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

आशियाई क्रीडा स्पर्धेत शनिवारी भारताने कबड्डीत लागोपाठ २ गोल्ड मेडल पटकावले. भारतीय महिला आणि पुरुष संघाने फायनलमध्ये इराणला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला. गोळाफेकीत भारताचा स्टार खेळाडू तजिंदरपाल सिंग तूर आशियाई क्रीडा स्पर्धेत गोल्ड मेडलची हॅट्रिक करण्यासाठी मैदानात उतरला होता. पण ही संधी थोडक्यात हुकली आहे. त्याने या स्पर्धेत सिल्व्हर मेडल पटकावलं आहे. जर त्याने या स्पर्धेतली ही गोल्ड मेडलला गवसणी घातली असती, तर तो एकाच स्पर्धेत ३ गोल्ड मेडल पटकावणारा पहिलाच भारतीय खेळाडू बनला असता.

गोळाफेकीत इराणच्या मोहम्मदरेजा तेब्बीसेने आशियाई क्रीडा स्पर्धेत २०.८२ मीटर थ्रो करून नवीन विक्रम प्रस्थापित केला. यासह तेजिंदरपाल सिंग तूरला मागे टाकून गोल्ड मेडलवर नाव कोरलं. या कामगिरीसह इराणच्या खेळाडूने तेजिंदरपाल सिंग तूरचा देखील विक्रम मोडून काढला आहे. तजिंदरपाल सिंग तूरने २०१८ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत २०.७५ मीटर लांब थ्रो केला होता. आता हा विक्रम इतिहासजमा झाला आहे. तजिंदरपाल सिंग तूरने २०.६४ मीटर लांब थ्रो करून रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. तर सौदी अरेबियाच्या मोहम्मद टोलूने २०.४८ मीटर थ्रो करून कांस्यपदकाला गवसणी घातली.

शनिवारचा दिवस भारतासाठी खास राहिला. भारताने कबड्डीत लागोपाठ २ मेडल्स पटकावले. सकाळच्या सत्रात भारतीय महिला संघाने कबड्डीच्या फायनलमध्ये इराणला धूळ चारली.




दोन्ही संघांमध्ये अतिशय चुरशीची लढत पाहायला मिळाली. पण शेवटी भारतीय महिला खेळाडू इराणच्या खेळाडूंवर भारी पडल्या. भारतीय महिला संघाने हा सामना ३७-३४ च्या फरकाने आपल्या नावावर केला.

महिला संघाने गोल्ड मेडल पटकावल्यानंतर पुरुष संघानेही इराणवर दमार विजयाची नोंद केली. या सामन्यातील पहिल्या हाफमध्ये इराणने आघाडी घेतली होती. पहिल्या हाफच्या समाप्तीनंतरही इराणचा संघ आघाडीवर होता. पण त्यानंतरद दुसऱ्या हाफमध्ये भारतीय संघाने दमदार पुनरागमन केलं आणि शेवट गोड केला. भारताने हा सामना ४०-३४ च्या फरकाने आपल्या नावावर करून गोल्ड मेडलवर नाव कोरलं.

## विनोद कांबळी वृद्धाश्रमात किती दिवस राहिले ? उपचार काय होते ?

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी पुन्हा चर्चेत आला आहे. विनोद कांबळीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, त्यामध्ये तो एका वृद्धाश्रमात दिसत आहे. विनोद कांबळी या व्हिडिओमध्ये वृद्धाश्रमाबद्दल बोलताना दिसत आहे. कांबळीला अशा अवस्थेत पाहून अनेक क्रिकेट चाहत्यांनी चिंता व्यक्त केली आहे. मात्र, या व्हिडिओमध्ये कांबळी स्वतः वृद्धाश्रमातील सुविधा आणि प्रसन्न वातावरणाचं कौतुक करताना दिसत आहे. पण विनोद कांबळी किती दिवसांपासून तिथे आहे आणि काय ट्रीटमेंट सुरू आहे, जाणून घेऊया.

विनोद कांबळी 'निदान द मुक्ती' या वृद्धाश्रमात आहे. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या NGOचे संस्थापक महेश नाईक यांनी सांगितलं की, कांबळी त्यांच्यासाठी 'हिरो' आहे आणि त्याला हवं तितके दिवस पूर्णपणे मोफत तिथे राहता येईल. नाईक म्हणाले, "विनोद कांबळी गेल्या वर्षी आमच्या संस्थेत दाखल झाला होता आणि जवळपास पाच ते सहा महिने आमच्यासोबत राहिला. आम्ही त्याला फिजिओथेरपी आणि इतर आवश्यक उपचार दिले. तो जेव्हा पहिल्यांदा आमच्याकडे आला, तेव्हा त्याच्यात साधं उभं राहण्याइतकीही ताकद नव्हती. मात्र, उपचारांना त्याने खूप चांगला प्रतिसाद दिला." महेश नाईक पुढे म्हणाले, "यावेळी विनोद कांबळी आमच्याकडे आला तेव्हाही आम्ही त्याला आवश्यक फिजिओथेरपी दिली. त्याला मधुमेहाचाही त्रास आहे. रक्तातील साखरेची पातळी जास्त असल्यामुळे त्याच्यावर उपचार करताना आम्हाला अतिरिक्त काळजी घ्यावी लागते. आता त्याची पत्नी त्याला घरी घेऊन गेली आहे." नाईक यांनी पुढे सांगितलं, "जेव्हा तो आमच्यासोबत असतो, तेव्हा तो नेहमी आनंदी आणि उत्साही असतो. खरं तर, ज्या



आकृती हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार सुरू होते, त्यांनीच त्याला आमच्याकडे पाठवलं होतं. "विनोद कांबळी आमच्यासाठी हिरो आहे. त्याला आयुष्यभरात जेव्हा कधी आमच्याकडे राहावंसं वाटेल, तेव्हा तो हवं तितके दिवस इथे राहू शकतो, तेही पूर्णपणे मोफत. त्याच्या उपचारांचा खर्चही आम्हीच उचलू. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, आमच्या हिरोप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळतेय, याचा आम्हाला आनंद आहे." कांबळीचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेक क्रिकेट चाहत्यांनी चिंता व्यक्त केली आहे. काही चाहत्यांनी त्याच्या प्रकृतीबद्दल काळजी व्यक्त केली, तर अनेकजण तो निरोगी आणि दीर्घायुषी राहावा, यासाठी प्रार्थना करत आहेत. गेल्या काही काळापासून विनोद कांबळी आजारपण, आर्थिक अडचणी आणि वैयक्तिक समस्यांमुळे चर्चेत आहे. याआधीही त्याचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या व्हिडीओमध्ये त्याला आधाराशिवाय चालणंही कठीण जात असल्याचं दिसत होतं. ते पाहून भारतीय क्रिकेट चाहते मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त करत होते.

# कोरड्या दुष्काळाचा जीआर फसवा असल्याचा आरोप बुलढाण्यात उबाठा आक्रमक, शासन निर्णयाची केली होळी.

## जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी..



**जनसंचलन/बुलढाणा**
राज्य सरकारने कोरड्या दुष्काळासंदर्भात काढलेला जीआर शेतकऱ्यांची फसवणूक करणारा असून, त्यातून शेतकऱ्यांना कोणताही दिलासा मिळणार नसल्याचा आरोप करत बुलढाण्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक आंदोलन केले. उबाठाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी कोरड्या दुष्काळाच्या जीआरची होळी करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दुष्काळामुळे शेतकरी संकटात असताना सरकारकडून ठोस मदत मिळत नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यावेळी आंदोलन आक्रमक झाल्याने पोलिसांनी जयश्री शेळके यांच्यासह आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. या आंदोलनामुळे बुलढाण्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

# बुलढाण्यात घुमणार संस्कृतीचा जागर! संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सव २०२६ चे भव्य आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**
बुलढाणा शहरात कला आणि संस्कृतीचा मोठा उत्सव साजरा होणार आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयात भव्य युवा महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली. राजर्षी शाहू महाविद्यालयात पार पडणाऱ्या या चार दिवसीय युवा महोत्सवात अमरावती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या २०५ महाविद्यालयांमधील ६ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी-कलावंत सहभागी होणार आहेत. एकूण २८ वेगवेगळ्या कला प्रकारांमध्ये हे विद्यार्थी आपली कला सादर करतील. या सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलावंतांसाठी ८४ विविध पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये आदर्श विद्यार्थी पुरस्कार, सर्वोत्कृष्ट एनसीसी कॅडेट पुरस्कार, उत्कृष्ट कलावंत आणि उत्कृष्ट विद्यार्थी विकास अधिकारी पुरस्कारांचा समावेश आहे. आयोजकांनी बुलढाण्यातील सर्व नागरिकांना आणि कलाप्रेमींना या युवा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्याचे आणि येणाऱ्या पाहुण्यांचे उत्साहात स्वागत करण्याचे आवाहन केले आहे. तर बुलढाण्यात रंगणाऱ्या या युवा महोत्सव २०२६ मुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे.




## भक्तीला देशभक्तीची जोड, सेवेला संस्कारांची साथ; शिवास्त्र प्रतिष्ठानचा गणेशोत्सव ठरला डोणगावच्या सामाजिक जाणीवेचा आदर्श!




**जनसंचलन/ डोणगाव**
गणेशोत्सव म्हणजे केवळ उत्सव, रोषणाई आणि मिरवणूक नव्हे, तर भक्तीच्या माध्यमातून समाजाला जोडण्याची, संस्कार रुजविण्याची आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची संधी आहे, हे आपल्या कार्यातून सातत्याने दाखवून देणारे शिवास्त्र प्रतिष्ठान गणेश मंडळ, डोणगाव यंदाही विविध समाजोपयोगी, धार्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभक्तीपर उपक्रमांच्या माध्यमातून विशेष ठरले. दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या गणेशोत्सवात श्री गणेश प्राणप्रतिष्ठा व महाआरतीपासून बालगोपाल क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, आरोग्य तपासणी व मोफत औषधी वाटप, बाल सांस्कृतिक कार्यक्रम, महिला भजन, व्याख्यान, भजन, कीर्तन, बारी संध्या, महाप्रसाद व अन्नदान आणि भव्य गणेश विसर्जन रॅली अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल राहिली. विशेष म्हणजे आरतीनंतर राष्ट्रगीताचे गायन करून देशभक्तीचा जागर करण्याची परंपरा मंडळाने जपली असून, देवाच्या चरणी नतमस्तक होताना मातृभूमीप्रती असलेले कर्तव्य आणि राष्ट्रप्रेमाची भावना मनामनात रुजविण्याचा सुंदर संदेश यामधून देण्यात आला. ‟एक बाप्पा, एक परिवार, सामाजिक उपक्रमांची परंपरा” या संकल्पनेतून स्वच्छ परिसर, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणपूरक गणेशोत्सव आणि सामूहिक सहभागाचा संदेश देत शिवास्त्र प्रतिष्ठानने भक्ती आणि सामाजिक जबाबदारीचा सुंदर समतोल साधला आहे. डोणगावात सातत्याने विधायक उपक्रम राबवत गणेशोत्सवाची धार्मिक परंपरा आणि देवाचे देवत्व अबाधित ठेवण्याचे काम करणाऱ्या या मंडळाच्या वाटचालीमागे अनेक ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांची निष्ठा आहे. रघुनाथ आखाडे, बंडू बोरकर, बंडू आखाडे, नितीन आखाडे, सचिन आखाडे, गजानन आखाडे, शैलेश आखाडे, बाल प्रसाद आखाडे, वसंता बोडखे, शंकर आखाडे, संदीप आखाडे, वामन आखाडे, भागवत आखाडे, विजय आखाडे आदी मार्गदर्शकांचे मार्गदर्शन मंडळाला लाभले. तर मंडळाचे अध्यक्ष सुबोध आखाडे, उपाध्यक्ष अंकुश आखाडे, सचिव पवन आखाडे यांच्यासह अमोल आखाडे, मनोज आखाडे, गौरव आखाडे, गोपाल आखाडे, अमोल बोडखे, ओम आखाडे, धनंजय आखाडे, शिवराज बोरकर, शिवम आखाडे, प्रसाद आखाडे, अभिजीत आखाडे, अभिषेक आखाडे, तन्मय बाजड, स्वप्निल आखाडे, श्याम आखाडे, अथर्व आखाडे, तुषार आखाडे, कृष्णा आखाडे, गणेश आखाडे, राजू आखाडे, आकाश आखाडे, महेश आखाडे, सिद्धार्थ आखाडे, संकेत पोधाडे यांच्यासह मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. विशेष म्हणजे बाप्पाच्या भक्तीतून माणुसकी, संस्कारातून सामाजिक बांधिलकी आणि आरतीनंतर राष्ट्रगीताच्या माध्यमातून देशभक्ती अशी त्रिसूत्री जपत शिवास्त्र प्रतिष्ठानने गणेशोत्सवाला एका व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. उत्सवाचे दिवस संपले तरी या उपक्रमांतून दिलेला सामाजिक एकोपा, स्वच्छतेचा संदेश, पर्यावरणाची जाणीव, अन्नदानाची भावना, संस्कृतीचे जतन आणि राष्ट्रभक्तीचा संस्कार डोणगावकरांच्या मनात दीर्घकाळ जिवंत राहणार आहे. म्हणूनच शिवास्त्र प्रतिष्ठानचा गणेशोत्सव हा केवळ बाप्पाच्या आगमन-विसर्जनाचा सोहळा नसून, ‟भक्तीपासून देशभक्तीपर्यंत आणि उत्सवापासून समाजसेवेपर्यंत” घेऊन जाणारा एक प्रेरणादायी प्रवास ठरला आहे



# ट्रक अडवला, चालकाला बेदम मारलं अन् कांद्यासह ३६.५० लाखांचा मुद्देमाल घेऊन फरार...

## डोणगाव पोलिसांचा चौघांवर शिकंजा!

**जनसंचलन/मेहकर**

समृद्धी महामार्गावर रात्रीच्या अंधारात ट्रकचालकाला अडवून मारहाण करत तब्बल ३६ लाख ५० हजार रुपयांचा ट्रक आणि कांद्याचा माल पळवून नेल्याच्या प्रकरणाने मोठी खळबळ उडाली होती. आता या प्रकरणात डोणगाव पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत चार आरोपींना अटक केल्याची माहिती समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील कौसंबी जिल्ह्यातील मिराज अहमद ऐजाज अहमद हा चालक गेल्या आठ-नऊ महिन्यांपासून रायपूर येथील रोडलाईन कंपनीचा -०४--९११३ क्रमांकाचा ट्रक चालवत होता. २५ सप्टेंबर रोजी तो आपल्या सहकाऱ्यासह तब्बल ३० टन ५६० किलो कांदा घेऊन समृद्धी महामार्गाने नागपूरच्या दिशेने निघाला होता.रात्री सुमारे ११.३० वाजता मेहकर-मालेगावदरम्यान डोणगाव परिसरातील भारत पेट्रोलपंपाजवळ पांढऱ्या रंगाच्या -१५--९००४ क्रमांकाच्या कारमधून आलेल्या चार इसमांनी ट्रक अडवल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले. तक्रारीनुसार, चालकाला जबरदस्तीने खाली उतरवत मारहाण करण्यात आली. त्यानंतर २५ लाख रुपये किमतीचा ट्रक आणि सुमारे ११ लाख ५० हजार रुपयांचा कांदा, असा एकूण ३६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन आरोपी पसार झाल्याचा आरोप आहे. घटनेनंतर डोणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३१७/२०२६ अन्वये कलम ३०९(६), १२६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाला वेग दिला आणि संशयितांचा माग काढत चौघांना ताब्यात घेत अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये गौरव हरिभाऊ पानसरे (वय २९, रा. पतरशेमबी, नाशिक), विषवजीत निवृत्ती ठोमसे (वय ३०, रा. पंचकेश्वर, निफाड), तेजस विलास ठोमसे (वय २०, रा. बोरथान, ता. निफाड) आणि अशुदेब गोबींदो दास (वय ३२, रा. कोलकाता) यांचा समावेश असल्याची माहिती आहे. रात्रीच्या महामार्गावर ट्रक अडवून लाखोंचा माल पळवण्याच्या या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, पळवलेला ट्रक व कांद्याचा माल कुठे नेण्यात आला, तसेच संपूर्ण कटामागे नेमके कोण आहे, याचा छडा लावण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे. या प्रकरणाचा पुढील तपास डोणगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार इंगोले करीत आहेत



### रताळीत शेतकरी संकटाचा आणखी एक बळी! १० एकर सोयाबीन उद्ध्वस्त, अडीच लाखांचा खर्च पाण्यात

# वडिलांचे कर्जमाफीच्या यादीत नावही नाही २६ वर्षीय आकाशने संपवले जीवन!

**जनसंचलन-सिंदखेडराजा**



बतालुक्यातील रताळी येथे शेतीतील प्रचंड नुकसान, वाढता आर्थिक ताण आणि कुटुंबावरील कर्जाच्या ओझ्याच्या पार्श्वभूमीवर २६ वर्षीय युवा शेतकरी पुत्राने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवार, २६ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. मृत युवकाचे नाव आकाश बळीराम पाटील (वय २६) असे आहे. आकाशचे वडील बळीराम पाटील यांच्याकडे अवघी चार एकर शेती आहे. पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार या शेतीवरच अवलंबून आहे. अल्प उत्पन्नामुळे कुटुंबातील सदस्य इतरांची शेती करून तसेच मजुरी करून संसाराचा गाडा चालवत होते. बळीराम पाटील यांनी २०१९-२० मध्ये भारतीय स्टेट बँकेकडून कृषी कर्ज घेतले होते. मात्र उत्पन्न घटत गेले आणि कर्जावरील व्याज वाढत राहिले. शासनाच्या कर्जमाफीच्या याद्या जाहीर झाल्या; मात्र पाटील यांचे नाव एकाही यादीत आले नसल्याचे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. यंदा आकाशने विठ्ठल गायकवाड यांची सुमारे १० एकर शेती ठोक्याने करून सोयाबीन आणि तुरीची लागवड केली होती. नांगरणी, वखरणी, बियाणे, खते आणि इतर कामांवर जवळपास अडीच लाख रुपये खर्च झाला. जुलैतील पावसानंतर पीक जोमात होते; मात्र ऑगस्ट-सप्टेंबरमधील दीर्घ पावसाच्या खंडाने संपूर्ण गणित बिघडवले. एकरी ८ ते १० क्विंटल सोयाबीनची अपेक्षा असताना अत्यल्प उत्पादनाची परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. शनिवारी सकाळी आकाश घराबाहेर पडला. काही वेळाने शेत परिसरात तो मृतावस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. साखरखेर्डा पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मेहकर ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पुढील तपास ठाणेदार युवराज रबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल निवृत्ती पोफळे करीत आहेत

# नाव एकच सान्वी रंगमंचावर मात्र युक्स जबरदस्त!

# नाच रे मोरात हिंगणे विजेती, खरात उपविजेती; टाळ्यांचा कडकडाट!

**जनसंचलन-बुलढाणा**

मोबाईलच्या स्क्रीनमध्ये हरवत चाललेल्या चिमुकल्यांच्या अंगातील कला थेट रंगमंचावर आणण्याचा बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचा प्रयत्न अक्षरशः सुपरहिट ठरला! वृत्तेश्वर गणेशोत्सवांतर्गत आयोजित ङ्गनाच रे मोराफ बालनृत्य स्पर्धेच्या ग्रॅण्ड फिनालेत चिमुकल्या कलाकारांनी असा काही जलवा दाखविला की उपस्थित अक्षरशः थक्क झाले. पहिली ते चौथीच्या बालगटासाठी रंगलेल्या या स्पर्धेत ऑडिशनमधून निवडलेल्या टॉप-१० स्पर्धकांमध्ये विजेतेपदासाठी जोरदार चुरस पाहायला मिळाली. पारंपरिक नृत्य, देवीचा गोंधळ आणि भक्तिगीतावर बहारदार सादरीकरण करीत कु. सान्वी विशाल हिंगणे हिने ₹७ हजारांचा प्रथम पुरस्कार पटकावत विजेतेपदावर मोहोर उमटवली. तर कु. सान्वी खरात हिने ₹५ हजारांचा द्वितीय पुरस्कार मिळवत उपविजेतेपद पटकावले. कु. अधिरा सगळे हिने ₹३ हजारांचा तृतीय पुरस्कार मिळविला. अधिरा नारखेडे आणि स्वरूषि भालेराव यांना प्रत्येकी ₹५०० चे प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. रंजना बोरीकर आणि मनोज नंद्रेकर यांच्या परीक्षणातून विजेत्यांची निवड करण्यात आली. अधिरा बोर्डे, स्वरा स्वामी, श्लोक हिवाळे, आर्या जाधव आणि अर्शिका पाटणकर यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेपूर्वी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या हस्ते वृत्तेश्वराची आरती झाली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही उपस्थिती लावत स्पर्धकांचा उत्साह




वाढविला. सिने कलाकार कृष्णा बोरीकर हिने तिच्या आगामी चित्रपटाबाबत संवाद साधला, तर गायक पत्रकारांच्या कराओके गीतांनी कार्यक्रमाला वेगळाच रंग चढविला. एकूणच, नाच रे मोराफ्च्या मंचावर त्या दिवशी स्पर्धा नव्हतीच चिमुकल्या प्रतिभेचा अक्षरशः विस्फोट झाला!

## अडोळी येथे सिद्धेश्वर गणेशोत्सव मंडळाची भव्य विसर्जन मिरवणूक

**जनसंचलन/ अडोळी**



अडोळी येथील श्री सिद्धेश्वर गणेशोत्सव मंडळाच्या वतीने श्री गणरायाची भव्य व दिव्य विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. पारंपरिक भक्तिमय वातावरणासोबत विविध कलांचे सादरीकरण करण्यात आल्याने मिरवणुकीला विशेष रंगत आली. मिरवणुकीदरम्यान विविध कार्टून, नाट्यकला तसेच मनोरंजनात्मक व सामाजिक संदेश देणाऱ्या कलांचे सादरीकरण करण्यात आले. या विविध कलाविष्कारांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गणरायाच्या जयघोषाने तसेच भजन, टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या विसर्जन मिरवणुकीत अडोळी येथील सर्व भजनी मंडळींचा उत्स्फूर्त सहभाग होता. तसेच गावातील महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिला मंडळींच्या लक्षणीय सहभागामुळे मिरवणुकीला विशेष शोभा आली. भक्तिमय वातावरणात, मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात श्री गणरायाला निरोप देण्यात आला. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मिरवणुकीचे नियोजन व व्यवस्थापन सुरळीतपणे केले. संपूर्ण विसर्जन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८